राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २३-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८२ | श्री. बादशहा हुसेन मुलाणी मु.पो. वडुज, ता.खटाव, जि.सातारा. | सचिव, शेती उत्पन्न बाजार समिती, वडूज, ता.खटाव, जि.सातारा. | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था वडूज, ता.खटाव, जि.सातारा. | कुरोली वि.का.सह सो.लि., कुरोली या संस्थेच्या मार्केट कमिटी लिंकिंग वसुली संबंधातील माहिती. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| २ | ४११ | श्री. प्रसाद गुलाब यादव मु.केसुर्डी, पो.नायगाव, ता.खंडाळा, जि.सातारा. | ग्रामसेवक ग्रामपंचायत केसुर्डी, पो. नायगाव, ता.खंडाळा, जि.सातारा. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती , खंडाळा, जि.सातारा. | गायरान गट नं. ३६१/१ व ७९३ सरकारी पड जमीन गट नं. ७४८ या जमीनीबाबत माहिती. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ३ | ४४८ | श्री.नागनाथ नरहरी भोसले मु.पो.यशवंतनगर, (भिमनगर), ता.वाई, जिल्हा सातारा. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाई, जिल्हा सातारा. | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा. | ग्राम सेवक जांब, ता.वाई यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाई यांनी दिनांक १०.१२.२००७ रोजी दिलेल्या पत्रानुसार किती रक्कम वसुल झाली व संबंधितांवर केलेली कारवाई याबाबत माहिती. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४५७ | डॉ. दिलीप सिताराम देशपांडे मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जिल्हा सातारा. | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, फलटण नगर परिषद, फलटण, जि.सातारा. | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि.सातारा. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग, फलटण अंतर्गत किरकोळ दुरुस्ती व विशेष दुरुस्ती बाबत कामाची यादी, व अंदाज पत्रकीय खर्चाबाबत माहिती, इ. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ५ | ४५९ | श्री. आकाश गुलाबराव राजेभोसले २३, देवी कॉलनी, सदर बाजार कॅम्प, सातारा-४१५ ००१. | वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे रेल्वे स्टेशन एस.टी. स्टँड, पुणे. | प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड, पुणे. | श्री. सी. एन. फडतरे, स.वा.अ. व अन्य राज्य स्तरीय कर्मचा-यांची सेवा कालावधीची माहिती, तसेच प्रशासकीय कारणास्तव केलेल्या बदलीची कारणे. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. |
| ६ | ४६८ | श्री. राजेंद्र जससिंग लादे रा. सैदापुर, ता.कराड, जि.सातारा. | ग्रामसेवक सैदापुर, सैदापुर, ता.कराड, जि.सातारा. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड, ता. कराड, जि.सातारा. | सैदापूर ग्रामपंचायतीच्या बँकेच्या खात्या वरील आर्थिक व्यवहाराची माहिती. | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. तत्कालीन ग्रामसेवक (श्री. मोरे), सैदापूर यांचेकडून जन माहिती आधिकारी यांनी दप्तर प्राप्त करुन अर्जदारास माहिती उपलब्ध करावी. |
| ७ | ४६९ | श्री. राजेंद्र जससिंग लादे रा. सैदापुर, ता.कराड, जि. सातारा. | ग्रामसेवक सैदापुर, सैदापुर, ता.कराड, जि.सातारा. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड, ता. कराड, जि.सातारा. | सैदापूर ग्रामपंचायतीच्या पंधरा टक्के अनुदानाबाबत व ग्राम पंचायतीच्या बोअरवेल संबंधात माहिती. | |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

# आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले (क्र.३८२, ४११, ४४८, ४५७, ४५९, ४६८ व ४६९) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-११-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८५ | श्री.शरद रामण्णा शेट्टी, प्लॉट नं.१४, वीरभद्र नगर, बाणेर, पुणे -४५ | आरोग्य उप संचालक, पुणे मंडळ, पुणे-१ | आरोग्य उप संचालक, पुणे मंडळ, पुणे-१ | डॉ.सुभाष साळुंखे, महासंचालक यांनी प्रस्तावित सर्वसाधारण बदल्याबाबत प्रस्तावित केलेल्या अहवालाची प्रत माहिती देण्यापर्यंतच्या बदल्यांबाबत संबंधित टिप्पणी वर्ग ३, ४ च्या बदल्याबाबत सेवा व इतर अनुषंगिक माहिती | उपलब्ध माहिती घेऊन जाण्यास सांगितले असता घेऊन जात नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे दि.२२.०८.२००६ चे निवेदन |
| २ | ३८८ | श्री.शरद रामण्णा शेट्टी | आरोग्य उप संचालक, पुणे मंडळ, पुणे-१ | आरोग्य उप संचालक, पुणे मंडळ, पुणे-१ | विभागीय आयुक्त, मागासवर्गीय (कक्ष)यांनी संवर्ग न्याय प्रमाणित केलेली बिंदू नामावली प्रत सह संचालक, आरोग्य सेवा यांच्या-कडून दि. ९.४.२००४ ने माहिती देईपर्यंत वर्ग केलेल्या पत्राची प्रती इ.बाबत सादर केलेल्या टिप्पणीची छायाप्रत उमेदवाराच्या पत्राच्या छायांकित प्रती डॉ.डोईफोडे झुंझारराव व सस्ते यांच्या सेवेत दाखल झाल्यापासून ते आजपर्यंत व त्यांनी सादर केलेल्या पालमत्ते विषयी इ.अनुषंगिक स्वरुपाची माहिती. | उपलब्ध माहिती घेऊन जाण्यास सांगितले असता घेऊन जात नाही असे जन माहिती अधिकाऱ्यांचे दि. १६.०८.२००६ चे निवेदन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३८७ | श्री.शरद रामण्णा शेट्टी | जिल्हा शल्य चिकीत्सक औंध उरो व सर्वसामान्य रुग्णालय, पुणे | आरोग्य उप संचालक, नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर, पुणे -१ | औंध उरो रुग्णालयाचे सामान्य रुग्णालय करावे अशी मागणी कोणाची होती. ( व्यक्ती ) संस्था, संघटना, त्यास कोण कोणत्या मंत्री महोदयांनी पाठिंबा दिला होता. औंध उरो रुग्णालयांच्या खाटांची माहिती (४०० बेडस्), विषयी,वर्ग-१ ते ४ ची मंजूर रिक्त पदे इ.बाबतची माहिती नावासह नोकर भरती, अनुकंपा तत्वावर प्रतिक्षा यादी किती आहे, त्यांना नेमणूक कधी देणार लाड, पागे समितीनुसार किती जणांना नेमणूका देणे आवश्यक आहे. इ.अनुषंगिक स्वरुपाची माहिती. | अपिलकर्त्यास मागणी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे . जन माहिती अधिकाऱ्यांचे दि.१४.१२.२००७ चे निवेदन |
| ४ | ३८९ | श्री.शरद रामण्णा शेट्टी | संचालक, इंदिरा कॉलेज, ताथवडे, ता.मुळशी, जि.पुणे - ४५ | कुलसचिव पुणे विद्यापीठ, पुणे -७ | इंदिरा कॉलेजच्या स्थापनेपासून सेट, एम.बी.ए. कोर्सची किती ॲडमिशन दिली. पुणे विद्यापीठाचे कोर्सेस वगळून इतर कोणते कोर्सेस चालू आहेत. कोणत्या विद्यापीठाची संलग्न मान्यता मिळवली आहे. व्यवस्थापन कोट्यातून किती जागा भरण्यात आल्या. सर्व राज्यांच्या विद्यार्थ्यांच्या आकडेवारी त्यात महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांची आकडेवारी बिंदू निमावलीप्रमाणे जाती निहाय संवर्गानुसार नोकर भरती करण्यात आली आहे का ? | जन माहिती अधिकारी इंदिरा इन्स्टियूट ऑफ मॅनेजमेंट पुणे-मुंबई रस्ता ताथवडे या संस्थेकडे अर्ज आलेला नाही. प्रथम अपीलही केलेले नाही. असे जन माहिती अधिकारी यांचे निवेदन पुणे विद्यापीठाकडेही प्रथम अपील केलेले नसल्याचे विद्यापीठाच्या जन माहिती अधिकारी यांचे दि.३.१२. २००७ चे निवेदन |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २०/१०/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८६ / कोल्हापूर | रमाकांत आप्पासो वीर ८६५/३४ व्यंकटेश रिंग रोड, कळंबा, कोल्हापूर ४१६ ००७ | प्रशासन अधिकारी , विभागीय सह संचालक, (उच्च शिक्षण) कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | विभागीय सह संचालक, (उच्च शिक्षण) कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | वेतन निश्चिती नियमाबाबत. | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| २ | ३६९ / कोल्हापूर | श्री. अशोक रामचंद्र रणदिवे मु.पो. नेसरी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | सुधारीत नळ पाणी पुरवठा योजनेबाबत कागदपत्रे मिळणेबाबत. | संपूर्ण माहिती मिळाल्याने अपील मागे घेत असल्याबाबत अपीलकर्त्याचे लेखी निवेदन प्राप्त झाले. |
| ३ | ४१० / कोल्हापूर | श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले ६०८/ई, शाहुपूरी, पहिली गल्ली, कोल्हापूर | निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | हक्क नोंदणी संकलन, नायब तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे हक्क नोंदणीसाठी आलेल्या अर्जाची व निर्गत झालेल्या अर्जाची माहिती. | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांनी १५ दिवसात अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे ठरले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४१५ / कोल्हापूर | श्रीमती बेबी हसन तांबोळी रा. मांगुरे गल्ली, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | अधिक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | मौजे हातकणंगले येथील सि.स.नं. १९९ क्षेत्र ५७.०४ चौ.मी. टेन्युआ अ चे मिळकातीचे हद्दी निश्चितीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत कागदपत्रे. | अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाली. अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ५ | ४२५ / कोल्हापूर | श्री. पुरुषोत्तम बाबुराव सुतार मु.पो.मुळाकुड, ता.कागल, जि.कोल्हापूर. | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कागले, ता.कागल, जि.कोल्हापूर. | अधिक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर, जि.कोल्हापूर. | कागल येथील तालूका भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणीसंदर्भातील गैरकारभारासंबंधी माहिती. | अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झाली. |
| ६ | ४२६ / कोल्हापूर | श्री. धोंडीराम यशवंत पाटील मु.पो.कुडित्रे, ता.करवीर, जि.कोल्हापूर. | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर. | अधिक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर, जि.कोल्हापूर. | मोजणी र.नं. २२३८/७/१९९१ बाबत. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने दि.०१-११-२००८ रोजी फॅक्स व्दारा कळविले. |
| ७ | ४३१ / कोल्हापूर | श्री. रविंद्र शंकर फाटक रा. ९/१७, सरस्वती मार्केट, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर. | मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर. | आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, विधान भवन, पुणे-१. | टि.पी. स्कीम नं. १ व २ चे अंमलबजावणीबाबत | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. जन माहिती आधिकारी यांनी सात दिवसात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करावी. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

# आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले (क्र. ३६९, ३८६, ४१०, ४१५, ४२५, ४२६ व ४३१) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-११-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २३.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. अभय श्रीराम बापट, ५६अ/१, केसरकर पेठ, सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४२१ / सातारा | जन माहिती अधिकारी, सातारा नगर परिषद, (आस्थापना विभाग), सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा जि. सातारा | सातारा नगर परिषद आस्थापना विभागामध्ये सन २००१ ते २००५ मध्ये मंजूर असणारी पदे, रिक्त पदे यासह एकूण चार मुद्दयांबाबतची माहिती | तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसात देण्याचे व माहिती उपलब्ध नसल्यास तसे कळविण्याचे ठरले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी पंधरा दिवसात माहिती अपीलकर्त्यास देऊन केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल आयोगाकडे सादर करावा.

पुणे
दि. २९.११.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्र. | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४३४/ सांगली | श्री.दिलीपराव सखाराम माने व्दारा माने ॲण्ड माने ऑटोमोबाईल, एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, ता वाळवा, जिल्हा सांगली | नायब तहसीलदार, वाळवा, जिल्हा सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, वाळवा विभाग, इस्लामपूर, जिल्हा सांगली | वाळवा तालुक्यातील शासकीय जमीनी कोठे आहेत? या जमिनीच्या ७/१२ चे उतारे इ. ५ मुद्दयांची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ५१७/ सांगली | श्री.हसामहमंद अ करीम इनामदार ट्रस्टी मॅनेजर,श्री हजरतपीर शकरगंज दर्गा ट्रस्ट , मिरज जालगाव रोड, प्लॉट नं. १३ अ गट सुभाषागर | निवासी नायब तहसीलदार , मिरज जिल्हा सांगली | तहसीलदार , मिरज जिल्हा सांगली | हजरत पीर शंकरगंज दर्गा ट्रस्ट, मिरज येथील स.नं.१९९ व २०० च्याजमिनीबाबत तहसीलदार सांगली यांनी टेनन्सी केस २०/६० मध्ये दिलेल्या निकालाची प्रत मिळणेबाबत. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ५२४/ सांगली | श्री.दिलीपराव सखाराम माने व्दारा माने ॲण्ड माने ऑटोमोबाईल, एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, ता वाळवा, जिल्हा सांगली | नायब तहसीलदार, वाळवा, जिल्हा सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, वाळवा विभाग, इस्लामपूर, जिल्हा सांगली | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नियम ४ बाबत एकूण चार मुद्दयांची माहिती . | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४६४/ सांगली | श्री.आण्णासो तुकाराम गायकवाड, मु.पो.सिध्देवाडी, ता.तासगाव, जिल्हा सांगली | सचिव श्री वीरभद्र सर्व सेवा सह.सोसायटी लि. सिध्देवाडी, ता. तासगाव, जिल्हा सांगली | सहनिबंधक , सहकारी संस्था, तासगाव, मु.पो.तासगाव, जिल्हा सांगली | तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या थकबाकीवर सभासदाची यादी व महाराष्ट्र सह संस्था अधिनियम १९६० कलम १०१ पोटकलम (१) किंवा (२) वसूलीची प्रमाणपत्रे मिळालेला सभासदाची यादी इ. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | ५०७/ सांगली | श्रीम.भारती मधुकर सावंत मु.पो.अक्षर कॉलनी, रस्ता क्र ४ दत्त टेकडी इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी , ता.पालूस, जिल्हा सांगली | विभागीय शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर | अपीलकर्त्याने सन १९९७-२००७ या कालावधीतील सेवा विषयक बाबी संबंधात माहिती मागितली. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ५१६/ सांगली | श्रीमती सिमा गणपत माळवकर हायस्कूल रोड, शिवराज कॉम्प्लेक्स, ३ रा मजला, मु.पो.मिरज, जिल्हा सांगली ४१६ ४१० | जन माहिती अधिकारी जिल्हा उप - निबंधक,सहकारी संस्था, सांगली, जिल्हा सांगली | अपिलीय प्राधिकारी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | शिवपार्वती, जयमहाराष्ट्र व जनलक्ष्मी या सहकारी संस्थच्या मुदतठेवी रक्कमेच्या एकूण ८ मुद्दयांची माहिती मागितली. | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र ठेवीच्या रक्कमा मिळण्याबातची मागणी माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत येत नाही. |
| ७ | ४८२/ सांगली | श्री.प्रभाकर सोमा मासाळ , मु.पो.बाज , ता.जत, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, बाज, ता.जत, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी , पंचायत समिती, जत, जिल्हा सांगली | सन २००५-२००६ या कालावधीतील आठवडे बाजार व जनावरांच्या यात्रेच्या जमाखर्च पावतीच्या छायांकित प्रती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ४८३/ सांगली | श्री.शंकर बापू ऐवळे मु.पो.बाज, ता.जत, जिल्हा सांगली | ग्रामसेवक,बाज, ता.जत, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी , पंचायत समिती, जत, जिल्हा सांगली | सन १९९९ ते सन २००६-२००७ या कालावधीतील ग्रामपंचायतचे उत्पन्न किती ? कोणकोणत्या योजनेतून किती रक्कम प्राप्त झाली, खर्चाचा तपशील व यामधील बचतीसंबंधित माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ९ | ४९५/ सांगली | श्री.शिवाजी आनंदा कापसे, मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्रामपंचायत , रेठरे धरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली. | गट विकास अधिकारी , वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर, जिल्हा सांगली | मु.पो.रेठरेधरण येथे घेण्यात आलेल्या मासिक सभा व ग्रामसभा यांचे १ वर्षाचे प्रोसिडिंग रिपोर्टच्या प्रती. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १० | ६०९/ सांगली | श्री.दिलीपराव सखाराम माने द्वारा माने ॲण्ड माने ऑटोमोबाईल, एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, ता वाळवा, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता , वारणा कालवे विभाग क्र. १, इस्लामपूर सांगली | अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर | दि.१/१/२००७ ते दि. ३१/१०/२००७ या कालावधीत अधिकारी, कर्मचारी यांच्या बदलीबाबत माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपीले (क्र १ ते १० )निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २०-११-२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
**कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१**

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** ४५७ / कोल्हापूर | | उपस्थिती |
| २. | **अपीलकर्ता** | श्री. दत्तात्रय मारुती मांजरे, ९/८५, दत्त कॉलनी, दत्त नगर, सांगली रोड, इचलकरंजी, ४१६ ११५, जि.कोल्हापूर | गैरहजर |
| ३ | **जन माहिती अधिकारी** | उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बां.उप वि.क्र.२, इचलकरंजी, जि.कोल्हापूर | हजर |
| ४ | **अपिलीय प्राधिकारी** | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बां.उप वि.क्र.२, इचलकरंजी, जि.कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय मारुती मांजरे, ९/८५, दत्त कॉलनी, दत्त नगर, सांगली रोड, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी, इचलकरंजी नगरपालिका, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांच्याकडे मजलेवाडी ते इचलकरंजी पाईप लाईन केलेली तारीख व त्याचा झालेला खर्च याविषयी माहिती दिनांक १४-०७-२००८ च्या अर्जान्वये मागितली होती. सदर माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अर्ज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठवून त्यांच्याशी संपर्क साधण्यास अपीलकर्त्यास कळविले. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बां.उप वि.क्र.२, इचलकरंजी यांनी त्यांच्या दिनांक २४-०७-२००८, दिनांक २२-०८-२००८ व दिनांक १०-१०-२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहितीसाठी शुल्क भरण्यास कळविले. परंतु अपीलकर्त्याकडून उचित प्रतिसाद मिळाला नाही. तसेच अपीलकर्त्यांनी संबंधीत अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले नाही असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००८ च्या पूरक कागदपत्रांसह आयोगास सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(२) आवश्यक असल्यास अपिलकर्त्याने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५-११-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २३.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. विजय निवृत्ती पाटील, मु.पो.काले, ता.कराड, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४७६ / सातारा | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा -इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | जिल्हा उप - निबंधक, सहकारी संस्था, कुबेरा चेंबर्स, जुना बुधगाव रोड, सांगली | अपीलकर्ता यांनी वसुली दाखला क्र.१६५६/२००६ चे दि.२५.१.२००६ मधील अर्जदार व जाबदार यांनी दाखल केलेली कागदपत्रे व हुकूम वगैरेसह एकूण चार मुद्दयांबाबतच्या कागदपत्रांच्या नकला मिळणेबाबतची मागणी केली होती. | दि. २३.१०.२००८ रोजी तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झालेली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २९.११.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९() अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर जकाप्पा हौदे
मु.पो.सलगरे, ता.मिरज, जि.सागली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सांगली जिल्हा परिषद, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, बी.एस.पाटील विद्यालय,
सलगरे, ता.मिरज, जि.सांगली — उत्तरवादी

| | |
|---|---|
| १ अपील क्रमांक | ५६अ / अपील / पुणे |
| २ सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर जकाप्पा हौदे
मु.पो.सलगरे, ता.मिरज, जि.सागली

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सांगली जिल्हा परिषद, सांगली प्रतिनिधी श्री.शमशुद्दीन आदमसाहेब शेख

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, बी.एस.पाटील विद्यालय,
सलगरे, ता.मिरज, जि.सांगली श्री.पांडुरंग बापू घागरे

| | |
|---|---|
| ४ जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१.२००६ |
| ५ जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.२.२००६ |
| ६ प्रथम अपिलाची तारीख | दि.६.३.२००६ |
| ७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.४.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कुमारी ज्योती शंकर हौदे यांच्या हजेरीपत्रकाची सत्यप्रत, नेमणूक आदेश, हजर रिपोर्ट, संस्था ठराव, मान्यता प्रस्तावाची छायांकित प्रत.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शंकर जकाप्पा हौदे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बी.एस.पाटील विद्यालय, सलगरे, ता.मिरज, जि.सांगली यांच्याकडे हजेरीपत्रकाच्या प्रतींसह विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून आपल्याला माहिती न मिळाल्याचे नमूद करुन श्री.हौदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त दि.१४.५.२००८ रोजी या अपिलाचा समावेश होता. परंतु तीनही घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कु.ज्योती शंकर हौदे या शिक्षिकेने तीन महिने केलेल्या कामाच्या हजेरीपत्रकाची सत्यप्रत, नेमणूक आदेश, शाळा समितीचा ठराव इ. माहिती आपल्याला मिळाली नसल्याचे श्री.हौदे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त प्रपत्रात व आयोगापुढे सुनावणीत नमूद केले. मात्र, 'श्री.हौदे यांच्या मुलीला नोकरी मिळावी यासाठी संस्थाचालकांनी अनुभवाचे प्रमाणपत्र दिले व मुलीचे हजेरीपत्रक तयार करुन घेतले. वैयक्तिक मदत करण्याच्या भूमिकेतून ही कृती केलेली असल्यामुळे शाळा समितीचा ठराव झालेला नाही, नियुक्ती आदेश दिलेला नाही, त्यामुळे प्रस्ताव तयार केलेला नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.पांडुरंग बापू घागरे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी सुनावणीत विस्ताराने केला. अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्याला दुजोरा दिला. मुख्याध्यापक म्हणून आपल्या कक्षेत असणारी सर्व माहिती दिली आहे. संस्थेकडील व न झालेल्या ठरावाची माहिती श्री.हौदे यांनी मागितली असून ती देता येणार नाही, असेही श्री.घागरे यांनी नमूद केले.

'आमचे विद्यालयातील सह शिक्षक श्री.सोलनकर बाबासाहेब शंकर हे सलगरे गावातील काही नागरिकांना शाळेविषयी खोटेनाटे अर्ज करुन माहिती मागवून त्रास देण्याचा सतत उद्योग करीत आहेत'. यापूर्वीही श्री.सोलनकर यांनी शाळा, संस्था, शिक्षण खाते व माहिती आयुक्तांना याबाबत खोटी माहिती देऊन त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे. (सोलनकर हे यापूर्वी विद्यालयामध्ये प्र.मुख्याध्यापक होते, सध्या ते पदावनत आहेत.) यापूर्वी अपील क्रमांक/०६/सांगली, दि.१८.३.२००८ व अपील क्रमांक/०६अ/सांगली, दि.१८.३.२००८ अन्वये सदर अपिले आपणाकडे दाखल झाली होती. सदर अपिलधारकांमार्फत श्री.सोलनकर यांनीच आपण आयोजित केलेल्या 'विशेष निर्गत अपील कार्यक्रमा'मध्ये बाजू मांडण्याचा प्रयत्न केला होता, आणि ती अपिले आपल्याकडून निकाली काढण्यात आलेली आहेत. 'आताही सदर अपिलदारामार्फत माहिती अधिकारान्वये मागणी केलेला माहितीचा अर्ज श्री.सोलनकर यांच्या हस्ताक्षरातील आहे. अर्ज दि.३०.१२.२००५, १२.१.२००६ व अपील अर्ज क्र.५६अ, दि.३.६.२००६ चा अर्ज हे त्यांच्याच हस्ताक्षरातील असल्याने सदर अपील अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती आपणांस करीत आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.पांडूरंग बापू घागरे यांनी दि.१२.११.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात लेखी व तोंडी नमूद केले. त्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता त्यांच्या म्हणण्यात तथ्य असल्याचे स्पष्ट होते. ही बाब गंभीर असून माहितीच्या अधिकाराचा व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कोणालाही त्रास देण्यासाठी वापर होत असल्यास त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

गेल्या वीस वर्षांपासून या शिक्षण संस्थेत अंतर्गत वाद आहेत. शासनाने संस्थेवर प्रशासक नेमला आहे, परंतु प्रत्यक्षात प्रशासकाला सूत्रे घेऊ दिली जात नाहीत. शिक्षणाधिकारी कार्यालयाकडूनही परस्परांना त्रास देण्याच्या हेतूने विविध स्वरुपाचे अर्ज केले जात असतात असे शिक्षणाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.शमसुद्दीन आदमसाहेब शेख (अधीक्षक, वर्ग-२, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली) यांनी नमूद केले.

संस्थेवर प्रशासक नेमला असतानाही प्रत्यक्षात त्यांना सूत्रे घेता आली नाहीत. तसेच माहितीच्या अधिकाराचा त्रास देण्यासाठी वापर केला जात असल्यास ती, अत्यंत गंभीर बाब आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी याबाबत लक्ष घालून अशा प्रकारचा गैरवापर होत असल्याचे आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील फेटाळण्यात येत आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगी यांनी श्री सिध्देश्वर शिक्षण प्रसारक संस्था, सलगरे, ता.मिरज, जिल्हा सांगली या संस्थेवरील प्रशासकांनी सूत्रे घेण्याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती १५ दिवसाच्या आत आयोगाला सादर करावी.

(३) अंतर्गत वादातून त्रास देण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा वापर करुन सर्व यंत्रणांचा निष्कारण वेळ घेतला जात असल्याबाबत व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ हेतूशी विसंगत अशी कृती करण्याबाबत संबंधितांची चौकशी करुन त्यात तथ्य आढळल्यास संबंधितांवर योग्य ती सेवाअंतर्गत कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी करावी व त्याबातचा अहवाल एक महिन्यात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २२-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्र. | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निर्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८६/ सांगली | श्री.विनायक दिनकर गोखले, समर्थ खादी भांडार, मेन रोड, जिल्हा सांगली | सहायक संचालक, नगररचना , सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानरपालिका जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जिल्हा सांगली | सांगली, मिरज आणि कुपवाड शहर प्रारुप विकास आराखडयाची सीडी मिळणेबाबत. | माहितीबाबत समाधान झाल्याने अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ३८७/ सांगली | श्री.संजय विजय भिडे १११९/१, उत्तर शिवाजीनगर,कै. विष्णू विनायक भीडे मार्ग, गणपती गॅस गोडावून जवळ. सांगली ४१६ ४१६ | सहाय्यकआयुक्त (सांगली), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानरपालिका, सांगली ४२६ ४१६ | आयुक्त, सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानरपालिका, सांगली ४२६ ४१६ | दि.१/४/२००६ ते ३१/३/२००७ पर्यंतची गुंतवणूक शिल्लक व कंत्राटदाराचे देणे याबाबतची माहिती | आवश्यक माहिती मिळाली असल्याने हे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २२/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ३ | ३८६/ सांगली | श्री.संजय विजय भिडे १११९/१, उत्तर शिवाजीनगर,कै. विष्णू विनायक भीडे मार्ग, गणपती गॅस गोडावून जवळ, सांगली ४१६ ४१६ | सहाय्यकआयुक्त (सांगली), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली ४२६ ४१६ | आयुक्त, सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली ४२६ ४१६ | बँकेतील खात्यांचा व दिलेल्या चेक्सच्या तपशिलाबाबत माहिती | आवश्यक माहिती मिळाली असल्याने हे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २२/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५६६/ सांगली | श्री.अल्लाबक्ष अ. रहिमान काझी नुर बिल्डिंग, मालगाव रोड, खोतनगर, मिरज, जिल्हा सांगली | शहर अभियंता, सांगली मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | खोतनगर येथील गल्ली नं.१,२,३, येथील डांबरीकरणाच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दयांची माहिती | अपील निकाली काढण्याबाबत अपिलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| ५ | ५२२/ सांगली | श्री.रमेश/रामदास सिताराम पवार सोनमळा, डॉ.पी.आर.पाटील मार्ग, गणेशनगर, जिल्हा सांगली | सहा. संचालक, नगररचना, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, जिल्हा सांगली | सांगली येथील पी आर पाटील मार्गावरील सि.स.नं. ४७१/८ या जागेतील विना परवाना अनधिकृत बांधकामबाबत (घराचे) नोटिशीबाबत माहिती | अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. मात्र विना परवानगी बांधकाम पाडण्याची मागणी आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ६ | ५००/ सांगली | श्री.सुजित राजाराम काटे सचिन मेन्स वेअर, संजयनगर, १०० फुटी रोड, सांगली , जिल्हा सांगली | शहर अभियंता, सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली ,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | श्री.तानाजी कणसे , उप कनिष्ठ अभियंता यांच्या सेवा विषयक बाबी संबंधात एकूण ११ मुद्दयांची माहिती | उभय बाजूंमध्ये चर्चा घेऊन मुद्दा क्र.२,८, व ९ याबाबत माहिती १५ दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. |
| ७ | ४१८/ सांगली | श्री.संभाजीराव दिनकरराव सावंत, प्लॉट नं. ३७ वसंत कॉलनी ,दिप एन्टरप्राझेसजवळ , सांगली ४१६ ४१६ | जकात अधिक्षक (सांगली) , सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महा- नगरपालिका, जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | श्री साई ट्रेडिंग कं.,सांगली जकात ठेकेदार यांचे शॉप ॲक्टचे रजिस्ट्रेशन, (लायसन्स) प्रत व इतर दोन मुद्दयांची माहिती | अपील निकाली काढण्याबाबत अपिलकर्त्याने नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ४८१/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | मालमत्ता व्यवस्थापक (सांगली) मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | आयुक्त सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | दि.१०/४/२००७ व दि.२६/४/२००७ च्या माहिती अर्जानुसार माहिती न देण्याची कारणे कोणती? माहिती न देण्यापासून वंचित ठेवण्याची कारणे ? | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने नमूद केले आहे. |
| ९ | ४५३/ सांगली | श्री.नारायण मारुती दबडे रा.उदगाव वेस, दबडे गल्ली, मिरज, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका | आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली | सिटी सर्व्हे नंबर असलेल्या रहिवासास उपयुक्त खाजगी मालमत्तेतून नळ कनेक्शन पाईप दुस-याचे मिळकतीत जोडून देता येतो का? | अपीलकर्त्याने अभिप्राय मागितला असून ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) वरील सर्व अपिले (क्र.५८६,३८७,३८८,५६६,५२२,५००,५८६,३८७,३८८) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. ५०० /सांगली मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना अपीलकर्त्यास १५ दिवसात माहिती देण्याबाबत प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाहीचा अनुपालन अहवाल दि. ५/१२/२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. पूर्तता न झाल्यास ते कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. १८-११-२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ६१९ / पुणे / २००७ | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री.वासुदेव कोंडूमल इदनानी<br>२७/३, पी.डब्ल्यू.डी.क्वार्टर्स,<br>पिंपरी कॉलनी, पुणे-४११०१७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस स्टेशन, पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस उपायुक्त, परिमंडळ, पुणे-३ | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.वासुदेव कोंडूमल इदनानी यांनी दि.२०.११.२००६ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पिंपरी यांच्याकडे श्री.धनराज नथुमल आसवानी यांच्याविरुध्द पिंपरी, पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती मागितली होती. ती १४.१२.२००६ रोजी दिलेली आहे. त्यांचे अपील आपल्या कार्यालयात प्राप्त झाले नव्हते. दि.२.६.२००८ चे आयोगाचे पत्र प्राप्त झाल्यावर, श्री.आसवानी यांच्याविरुध्द पिंपरी, भोसरी, निगडी व हिंजवडी पोलीस स्टेशनकडे दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती त्या ठाण्यांकडून घेऊन श्री.इदनानी यांना दि.११.६.२००८ रोजी आदा करण्यात आली आहे, असे श्री.प्रभाकर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पुणे शहर यांनी आयोगाला दि.१२.६.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. तशी अपीलकर्त्याची पोहोच प्राप्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २२१-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ६२०/ सांगली | श्री.कृष्णा विष्णू जंगम मु.पो.ता.वाळवा, जिल्हा सांगली | परिक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४ | कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४ | सन १९९१ ते २००८ या कालावधीतील डी-लिट पदवीच्या अनुषंगाने एकूण ६ मुद्द्यांची माहिती | आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २. | २८८/ सांगली | श्री वसंत सत्तू भोसले मु.पो.इनामधामणी शेवा निवास, ता.मिरज, जिल्हा सांगली | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, मिरज, जिल्हा सांगली | तहसिलदार, मिरज, जिल्हा सांगली | केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नियम ४ बाबत माहिती | अपीलकर्त्यास दि.११/११/०८ पूर्वी विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ४९६/ सांगली | श्री.रामचंद्र विष्णू साळूंखे, तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | माध्यमिक शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद सांगली | मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली | बा.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द, जि.सांगली येथे दि.११/४/२००७ रोजी सेवा जेष्ठताबाबत दिलेल्या निवेदनाबाबत उपशिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी सादर केलेल्या चौकशीच्या अहवालाची माहिती | अपीलकर्त्यास दि.१५.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले (क्र.१ ते ३ ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल आदेश प्राप्त होताच आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. २०-११-२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ